नि.फौ.मा.क्र.२५९/२०१९
सरकार –वि– विलास
<u>निशाणी क्रमांक २७</u>

<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष शपथेवर सुरू</u> :–

माझे नाव :– भिमराव शेषराव डोंगरे
वय :– ४० वर्ष, व्यवसाय :– शेती
राहणार :– आडसुळ, ता.शेगांव, जि.बुलढाणा

<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू</u> :–

१. मी आरोपीला ओळखतो. ते माझे काका आहेत. सन २०१९ मध्ये माझे व आरोपीच्या पत्नीमध्ये वाद झाला होता व बोलचाल झाली होती. मी रागाचे भरात फिर्याद दिली. आता मला फिर्याद व छापील फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. पोलीसांनी मला फिर्याद वाचुन दाखविली नाही. त्यास अनुक्रमे **नि.क्र.२८ व २९** देण्यात येतो. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले नाही. पोलीसांनी याव्यातीरीक्त कुठलीही कार्यवाही केली नाही. असे काही घडले नाही की सन २०१८ मध्ये आरोपीने मला व माझे पत्नीला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्त्याच्या तोंडी विनंतीवरुन या साक्षदाराला उलटतपासणी स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवाणगी देण्यात आली.)**

२. आता मला माझे फिर्याद व बयाणातील अधोरेखांकीत भाग अ वाचुन दाखविला. तो बरोबर नसुन खोटा आहे. पोलीसांनी तो तसा का नमुद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की आरोपींसोबत माझे आज रोजी न्यायालयाबाहेर आपसांत झाले आहे. प्रकरण आपसांत करण्यास माझेवर कोणाचाही दबाव नाही. हे म्हणने खरे आहे की त्याबाबत न्यायालयात पुरसीस दाखल केली आहे. हे म्हणने खरे नाही की प्रकरण आपसांत केल्यामुळे तसेच ते माझे काका असल्यामुळे व त्यांना वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री.ब्राम्हणे वकील यांनी नाकारला.**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.** **माझे समक्ष,**

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.02.24 16:48:08 +0530

| | |
|---|---|
| **( एम. के. गोटे )** | **( एम. के. गोटे )** |
| न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, | न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, |
| शेगाव. (कोर्ट नं.२) | शेगाव. (कोर्ट नं.२) |
| **दिनांक – २४.०२.२०२६** | **दिनांक – २४.०२.२०२६** |